मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मोशीसह उपनगरांत विजेच्या कडकडाटासह जोरदार पाऊस

## वादळी वाऱ्यामुळे झाडे कोसळली; सखल भागांत पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील मोशी आणि परिसरात शुक्रवारी दुपारी वादळी वाऱ्यासह आणि विजांच्या कडकडाटासह झालेल्या जोरदार अवकाळी पावसाने झोडपून काढले. गेल्या काही दिवसांपासून नागरिकांना तीव्र उकाड्याचा सामना करावा लागत होता, ज्यामुळे या पावसाने हवेत गारवा आणून नागरिकांना मोठा दिलासा दिला आहे.

या अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी पडझड झाली. काही ठिकाणी झाडे उन्मळून पडली: जोरदार वादळी वाऱ्यामुळे मोशी आणि आजूबाजूच्या परिसरात अनेकठिकाणीझाडेआणिझाडांच्या मोठ्या फांद्या कोसळल्याच्या घटना घडल्या आहेत. संभाजीनगरमध्ये इरफानभाई सय्यद यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या बाजूचे झाड कोसळून पडले. कुठलीही जिवितहानी झाली नाही. मात्र वाहतूकीचा खोळंबा झाल्याचे चित्र पहायला मिळाले.

चिखली, मोशी, तळवडे, डुडूळगाव, घरकुल या परिसरात सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे वाहतूक यंत्रणा संथ झाली असून कोंडी निर्माण झाली आहे.वीजपुरवठा खंडित: विजांचा कडकडाट आणि वाऱ्यामुळे अनेक भागांतील वीजवाहिन्यांवर फांद्या पडल्याने खबरदारी म्हणून आणि बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित झाला आहे.अग्निशमन दल सतर्क: मोशीसह पिंपरी-चिंचवडच्या विविध भागांतून झाडपडीचे कॉल आल्यानंतर अग्निशमन दलाचे जवान तातडीने रस्ते मोकळे करण्याचे काम करत आहेत.



### सुरक्षेसाठी महत्त्वाच्या सूचना

» हवामान खात्याने पुढील काही तास सतर्क राहण्याचा इशारा दिला असल्याने नागरिकांनी खालील काळजी घ्यावी:झाडांखाली आश्रय घेऊ नका: वादळी वाऱ्यामुळे झाडे किंवा त्यांच्या फांद्या पडण्याचा धोका असतो, त्यामुळे वाहन चालवताना किंवा थांबताना झाडांचा आडोसा घेऊ नका.घराबाहेर पडणे टाळा: अतिशय महत्त्वाचे काम नसेल तर विजा चमकत असताना घराबाहेर पडणे आणि प्रवास करणे टाळा.इलेक्ट्रिक वस्तूंपासून दूर राहा: विजांच्या कडकडाटादरम्यान घरातील वीज उपकरणे बंद ठेवा आणि उघड्या वीजवाहिन्या किंवा खांबांना स्पर्श करू नका.तुमच्या परिसरात पावसाचा जोर सध्या कसा आहे किंवा काही अडचण निर्माण झाली आहे का, हे नक्की सांगा जेणेकरून अधिक माहिती देता येईल.

### शहरासह उपनगरांत वादळी पावसाचा तडाखा

**अनेक ठिकाणी झाड पडल्याची घटना**

पिंपरी चिंचवड शहरात आज दुपारी झालेल्या वादळी पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे अनेक भागांमध्ये नुकसान झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. वाल्हेकरवाडीत वाहनांवर झाड कोसळल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही.

दरम्यान, भोसरी मोशी परिसरात दोन ठिकाणी मोठी झाडे रस्त्यावर कोसळल्याने वाहतुकीवर काही काळ परिणाम झाला. स्थानिक नागरिक आणि अग्निशमन विभागाच्या मदतीने झाडे हटवण्याचे काम हाती घेण्यात आले.

तसेच मारुंजी परिसरातही जोरदार वाऱ्यामुळे झाड पडल्याची माहिती समोर आली आहे. अचानक बदललेल्या हवामानामुळे शहरातील अनेक भागांमध्ये अंधाराचे वातावरण निर्माण झाले होते. महापालिका प्रशासनाने नागरिकांना पावसाळ्यात सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, वादळी वाऱ्याच्या वेळी झाडांखाली अथवा उघड्या जागेत उभे राहू नये, असे सांगितले आहे.

# आखाती देशांतील युद्धाचा पिंपरी-भोसरी एमआयडीसीला मोठा फटका

## मनुष्यबळ आणि आर्थिक संकटात लघुउद्योग होरपळले, कामगार व मजुरांमध्ये चिंतेचे वातावरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

आखाती देशांमध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीचे आणि वाढत्या महागाईचे थेट सावट आता पिंपरी-चिंचवड आणि भोसरी औद्योगिक क्षेत्रावर (एमआयडीसी) पडू लागले आहे. या जागतिक घडामोडींमुळे स्थानिक पातळीवरील बाजारपेठेचे गणित बिघडले असून, गेल्या मार्च महिन्यापासून येथील कंपन्यांना मनुष्यबळाचा तीव्र तुटवडा जाणवत आहे. कच्च्या मालाचे वाढते भाव आणि जागतिक मंदीच्या भीतीमुळे परप्रांतीय कामगार व मजुरांमध्ये चिंतेचे वातावरण असून, ते मोठ्या संख्येने आपापल्या गावी परतत आहेत. कामगारांचा हा गावाकडे जाण्याचा ओघ थांबण्याचे नाव घेत नसल्याने, आशियातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या भागातील अनेक लघु व मध्यम उद्योग सध्या आर्थिक आणि मनुष्यबळाच्या दुहेरी संकटात पुरते अडकले आहेत.

(उर्वरित पान २ वर)



### उद्योग क्षेत्राच्या प्रश्नांसाठी एकजूट आवश्यक

» औद्योगिक नगरी म्हणून ओळख असणाऱ्या पिंपरी चिंचवड शहराची परिस्थितीत लक्षात घेता लवकरच विविध औद्योगिक संघटनांनी एकत्र येऊन उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घ्यावी व त्यांना परिस्थितीचे गांभीर्य निदर्शनास आणून द्यावे असेही मत काही उद्योजकांनी व्यक्त केले आहे.

# बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक संपन्न

## कुर्बानीस्थळी पाणी, स्वच्छता आणि सुरक्षा व्यवस्था सज्ज; प्रशासनाकडून नियम पाळण्याचे आवाहन



**पिंपरी | प्रतिनिधी**

बकरी ईदच्या अनुषंगाने दरवर्षीप्रमाणे सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वय साधून नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये कोणत्याही त्रुटी राहणार नाही याची दक्षता घ्यावी, अशा सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच या सणाचे महत्त्व लक्षात घेता नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करून नियमांचे पालन करावे, असे आवाहन देखील त्यांनी केले.

बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने महापालिका प्रशासन, पोलीस विभाग तसेच शहरातील विविध संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. चिंचवड येथील ऑटो क्लस्टर सभागृहात आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सहशहर अभियंता प्रेरणा सिनकर, उप आयुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता माणिक चव्हाण, सुनीलदत्त नरोटे, विजयसिंह भोसले, महेश कावळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरूण दगडे, सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्यासह पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे सहाय्यक पोलीस आयुक्त प्रविण मोरे, पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ, महेंद्र कदम तसेच कुरेशी जमात व्यापारी संघटनेचे युसूफ कुरेशी, गफ्रूर कुरेशी, जमील कुरेशी, शकिल कुरेशी, मौलाना तनवीर, मौलाना फल्नेहक, सबिर कुरेशी, करीम कुरेशी, अकबर कुरेशी, तायपाज कुरेशी, ईर्शाद कुरेशी, शफिक काझी, ऐफाज कुरेशी आदी उपस्थित होते.

महापालिकेच्या वतीने कुर्बानीसाठी निश्चित करण्यात आलेल्या तात्पुरत्या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यामध्ये पत्राशेड, मंडप, पुरेसा पाणीपुरवठा, मोबाईल टॉयलेट व्हॅन, स्वच्छतेसाठी आवश्यक मनुष्यबळ तसेच वेस्ट संकलनासाठी स्वतंत्र यंत्रणा उपलब्ध करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

कुर्बानीसाठी आणण्यात येणाऱ्या जनावरांच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र जागा, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच अतिरिक्त पाणीपुरवठ्यासाठी टँकर आणि हौदांची व्यवस्था करण्यात येणार आहे. कुर्बानीनंतर निर्माण होणारा कचरा व वेस्ट तात्काळ उचलण्यासाठी विशेष पथके कार्यरत राहणार असून परिसरात स्वच्छता राखण्यावर भर देण्यात येणार आहे. याशिवाय, सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत. कुर्बानीसाठी मागील वर्षीप्रमाणे नेहरू नगर डॉक पॉइंट येथील जागा निश्चित करण्यात आल्याची माहिती उप आयुक्त संदीप खोत यांनी यावेळी दिली.

बैठकीदरम्यान विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी पाणीपुरवठा अधिक प्रमाणात उपलब्ध करून देणे, जनावरे बांधण्यासाठी किमान तीन ते चार दिवस आधी अतिरिक्त जागा उपलब्ध करणे तसेच मंडप आणि पत्राशेड परिसरात सातत्याने स्वच्छता राखण्याबाबत सूचना मांडल्या. महापालिका प्रशासनाच्या वतीने या मागण्यांची योग्य दखल घेण्यात येईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# 'पे अँड पार्क' पॉलिसी पुन्हा आणणार

## पिंपरी-चिंचवड महापालिकेचा निर्णय



**पिंपरी | प्रतिनिधी**

राजकीय विरोध, पोलिसांचा असहकार, पोलिसांकडून वाहनांवर कारवाईस टाळाटाळ आणि दमदाटीचे वाढलेले प्रकार यामुळे शहरातील काही प्रमुख रस्त्यासाठी आणलेले सशुल्क वाहनतळ (पे अँड पार्क) धोरण गुंडाळल्यानंतर आता संपूर्ण शहरासाठी नव्याने वाहनतळ धोरण आणण्यात येणार आहे. मागील धोरणातील त्रुटींमध्ये सुधारणा करून नव्याने सर्वंकष आराखडा तयार केला आहे. तीन टप्प्यांत त्याची अंमलबजावणी करण्याचे नियोजन असून, यामुळे शहर कोंडीमुक्त होईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.

या धोरणाची अंमलबजावणी तीन टप्प्यांत करण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात वर्दळीची ठिकाणे, त्यानंतर वाहने उभी करण्यासाठी जागा उपलब्ध आहे तिथे आणि तिसऱ्या टप्प्यात कामे पूर्ण झालेल्या रस्त्यांवर वाहनतळ धोरण राबविण्यात येणार आहे. विकासकामे सुरू असलेल्या रस्त्यांवर कोंडीत भर पडू नये यासाठी सुरुवातीला धोरण राबविले जाणार नाही.

# आखाती देशांतील युद्धाचा पिंपरी-भोसरी एमआयडीसीला मोठा फटका

{ पान १ वरून }

या भीषण टंचाईचा सर्वाधिक फटका उत्पादन क्षेत्राला बसला असून, कंपन्यांनी ठरवून दिलेली उद्दिष्टे वेळेत पूर्ण करणे अशक्य झाले आहे. ऑर्डर हातात असूनही त्या वेळेत पूर्ण न झाल्यास ग्राहक हातचे जाण्याची भीती उद्योजकांना सतावत आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि आलेली ऑर्डर टिकवण्यासाठी अनेक कंपन्या दुप्पट रोजंदारी म्हणजेच दुप्पट पगार देण्यासही तयार आहेत, मात्र तरीही आवश्यकतेनुसार कुशल आणि अकुशल कामगार उपलब्ध होत नसल्याचे चित्र आहे. वाढत्या महागाईमुळे उत्पादन खर्च आधीच गगनाला भिडला असताना, दुसरीकडे मजुरीचा खर्च दुप्पट करूनही कामगार न मिळणे यामुळे कंपन्यांची आर्थिक गणिते पूर्णपणे कोलमडली आहेत. कामगारांचे सातत्याने होणारे हे पलायन जर असेच सुरू राहिले आणि आंतरराष्ट्रीय बाजारातील अनिश्चितता दूर झाली नाही, तर पिंपरी-भोसरी एमआयडीसीतील लघुउद्योगांना येत्या काळात मोठ्या आर्थिक मंदीला तोंड द्यावे लागेल, अशी भीती आता उद्योजक वर्गातून व्यक्त केली जात आहे.

सुरुवातीला युद्धाच्या परिस्थितीमुळे गॅस उपलब्ध होत नव्हता, ज्यामुळे काम कमी झाले आणि भीतीपोटी फेब्रुवारी दरम्यान बरेच कामगार गावी निघून गेले. सध्याच्या काळात लग्नसराई, उन्हाळा आणि विविध घरगुती कार्यक्रमांमुळे कामगार मोठ्या संख्येने गावी गेले असून अजून परतलेले नाहीत. या गंभीर परिस्थितीमुळे मालकाला स्वतः प्रत्यक्ष उतरून काम करावे लागत आहे. मुले आणि कुटुंबासह गावी गेलेले हे कामगार आता शाळा सुरू होण्याच्या काळात म्हणजेच जून महिन्यापर्यंत परतण्याची शक्यता आहे.



> **एकूण सुमारे साडेतीन लाख कामगारांपैकी सध्या जवळपास दीड लाख कामगार उपलब्ध नाहीत, ज्यामुळे उत्पादनावर प्रचंड परिणाम होत आहे. कामगारांअभावी वेळेत कामे पूर्ण करणे अशक्य झाले असून, केवळ मजूरच नाही तर सुपरवायझर, इंजिनिअर आणि ऑफिस स्टाफ देखील उपलब्ध नाही.**
>
> **- संदीप बेलसरे, अध्यक्ष, पिंपरी-चिंचवड लघुउद्योग संघटना**

> **जागतिक स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या या आर्थिक चक्रव्यूहातून बाहेर पडणे सध्या तरी स्थानिक लघुउद्योगांच्या आवाक्याबाहेरचे दिसत आहे. आधीच कच्च्या मालाचे वाढलेले दर आणि आता थेट उत्पादनावर झालेला हा परिणाम यामुळे छोटे कारखाने बंद पडण्याच्या मार्गावर आले आहेत. लघू उद्योग संकटात सापडले आहेत.**
>
> **- राजश्री गागरे, उद्योजिका**

# पुण्यात आचारसंहिता सुरु महापालिकेने पाठवले जिल्हाधिकाऱ्यांना पत्र !

## पावसाळापूर्व कामे, नालेसफाई आणि पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर तातडीने निर्णय घेण्यासाठी परवानगीची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता जाहीर झाल्यामुळे कामे रखडणार आहेत. त्यामुळे या काळात महापालिकेची स्थायी समितीची बैठक घेता येईल का? याबाबत पुणे महापालिकेने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे मार्गदर्शन मागितले आहे. महापालिकेच्या नगरसचिव योगिता भोसले यांनी याचे पत्र जिल्हाधिकारी कार्यालयाला पाठविले आहे.

पुणे जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधीतून निवडून दिल्या जाणाऱ्या विधानपरिषदेच्या एका जागेसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या निवडणुकीची आचारसंहिता सोमवारपासून सुरु झाली आहे. त्यामुळे महापालिकेच्या स्थायी समिती, सर्वसाधारण सभेसह विविध विशेष समित्यांचे कामकाज बंद झाले आहे. आचारसंहिता सुरु झाल्याने महापालिकेच्या कामकाजावर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे याबाबत स्पष्टता द्यावी, असे पत्र महापालिकेने जिल्हाधिकाऱ्यांना पाठविले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार स्थायी समितीची बैठक महिन्यातून एकदा घेणे आवश्यक आहे. आर्थिक बाबींवरील निर्णय देखील या समितीमार्फत घेतले जातात. गुरुवारी (२१ मे) स्थायी समितीची पूर्वनियोजित बैठक होती. मात्र आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर ही बैठक तहकूब करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला.

दोन महिन्यांमध्ये शहरात संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे आगमन होणार आहे. यासाठी काही कामे करणे आवश्यक आहेत. तसेच शहरात पावसाळ्यापूर्वीची कामे, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, रस्त्यांवरील खड्डे, पाणी साचण्याच्या समस्या आणि नव्याने समाविष्ट झालेल्या गावांतील नागरी सुविधा यांसारख्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. नाले सफाईची कामे देखील करणे आवश्यक आहे, असे महापालिकेने पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.



### पालखी सोहळा आणि पावसाळी कामांसमोर आव्हान

» संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात अनेक तातडीची कामे करणे आवश्यक आहे. नालेसफाई, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, खड्डे दुरुस्ती आणि नव्याने समाविष्ट गावांतील नागरी सुविधा यांसारख्या कामांसाठी त्वरित मंजुरीची आवश्यकता आहे. मात्र आचारसंहितेमुळे निर्णय प्रक्रियेत अडथळे निर्माण होत आहेत. पावसाळा जवळ आल्याने वेळेत कामे पूर्ण न झाल्यास नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे अत्यावश्यक कामांना परवानगी मिळावी, यासाठी महापालिकेने जिल्हाधिकाऱ्यांकडे विशेष विनंती केली आहे.

### प्रशासनाकडून मार्गदर्शनाची प्रतीक्षा

» महापालिकेच्या नगरसचिव योगिता भोसले यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाला पत्र पाठवून आचारसंहितेच्या काळात कोणते निर्णय घेता येतील, याबाबत मार्गदर्शन मागितले आहे. स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनीही शहरातील अत्यावश्यक कामे रखडू नयेत, यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले. विशेषतः नालेसफाई आणि पालखी सोहळ्याशी संबंधित कामे वेळेत पूर्ण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. निवडणूक आयोगाच्या नियमांचे पालन करत शहरातील दैनंदिन सुविधा आणि विकासकामे सुरळीत ठेवण्यासाठी योग्य कार्यपद्धती निश्चित करण्याची गरज प्रशासनाने व्यक्त केली आहे.

### स्थायी समिती बैठकीवर आचारसंहितेचे सावट

» पुणे विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर पुणे महापालिकेच्या स्थायी समितीसह विविध समित्यांचे कामकाज प्रभावित झाले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार महिन्यातून एकदा बैठक घेणे आवश्यक असतानाही पूर्वनियोजित बैठक तहकूब करण्यात आली. आर्थिक निर्णय आणि तातडीच्या कामांवर याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. त्यामुळे महापालिकेने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याकडे मार्गदर्शन मागितले आहे. निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार अत्यावश्यक विषयांसाठी पूर्वपरवानगी घेऊन बैठक घेता येईल का, याबाबत प्रशासनाने स्पष्टता मागविली असून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुण्यातील ज्येष्ठ रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी खुशखबर; सन्मान निधी योजनेतून मिळणार 10 हजार रुपये

## धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची योजना; पात्र चालकांना ऑनलाईन नोंदणीचे आरटीओचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सीचालक मालक कल्याणकारी मंडळांतर्गत पात्र ठरणाऱ्या ज्येष्ठ सभासदांना 10 हजार रुपये इतका लाभ सन्मान निधी योजनेअंतर्गत दिला जाणार आहे.

पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे जिल्ह्यातील सर्व पात्र रिक्षा व टॅक्सीचालकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी तातडीने ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

ज्यारिक्षाकिंवाटॅक्सीचालक-मालक सभासदांनी 1 जानेवारी 2026 रोजी वयाची 65 वर्षे पूर्ण केली आहेत. ज्यांनी 1 मे 2026 पर्यंत धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सीचालक-मालक कल्याणकारी मंडळाकडे आपली अधिकृत सभासद नोंदणी पूर्ण केली आहे, अशा ज्येष्ठ सभासदांना 10 हजार रुपये लाभ मिळणार आहे.

या योजनेचा थेट लाभ मिळवण्यासाठी पात्र धारकांनी मंडळाच्याअधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन सभासद नोंदणी करणे बंधनकारक आहे. तसेच, लाभ थेट खात्यात जमा होणार असल्याने सभासदांनी याच संकेतस्थळावर जाऊन आपल्या बँक खात्याची माहिती अद्ययावत करावी, असे आरटीओ प्रशासनाने केले आहे.



### अर्जदाराकडील आवश्यक कागदपत्रे

- » ड्रायव्हिंग लायसन्स (अनुज्ञप्ती)
- » आरटीओ बॅज व परवाना (परमिट)
- » आधार कार्ड
- » पॅन कार्ड
- » रेशन कार्ड
- » बँक खाते तपशील (बँक पासबुक/कॅन्सल चेक)

" शासनाने सुरू केलेली ही योजना रिक्षा आणि टॅक्सीचालकांना वृद्धापकाळात आर्थिक आधार देणारी आहे. पुणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त ऑटोरिक्षा व मिटर्ड टॅक्सी परवानाधारकांनी मंडळाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून या सन्मान निधीचा लाभ घ्यावा.

- स्वप्निल भोसले, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे

# पुणे मेट्रोसोबत आता वाहनेही सुसाट!

## महामेट्रोच्या प्रकल्पामुळे वाहतूक कोंडीला दिलासा; वनाझ-चांदणी चौक मार्गावर 1.12 किमी दुमजली उड्डाणपूल



**पुणे | प्रतिनिधी**

पुण्यातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी मेट्रो मार्गांचा विस्तार आणि उड्डाणपुलांची उभारणी सुरू असल्याचे चित्र सध्या दिसते. आता मेट्रो मार्गांवरच दुमजली उड्डाणपूल (डबलडेकर) उभारणीचे पाऊल उचलण्यात आले आहे. कर्वेनगर आणि गणेश खिंड रस्त्यानंतर आता शहरात आणखी तीन ठिकाणी अशा दुमजली उड्डाणपुलांचे नियोजन करण्यात आले आहे. यामुळे वाहतुकीचा वेग वाढण्यास मदत होणार आहे.

महामेट्रोकडून शहरात मेट्रोच्या पहिल्या टप्प्या ३३ किलोमीटरचे जाळे उभारण्यात आले आहे. आता पहिल्या टप्प्याचा ४.४ किलोमीटरच्या विस्ताराचे काम सुरू आहे. याचबरोबर अतिरिक्त ५५ किलोमिटरचे जाळे विस्तारणार आहे. या विस्तारित जाळ्यात दुमजली उड्डाणपूल उभारण्याचे नियोजन महामेट्रोने केले आहे. या दुमजली उड्डाणपुलांची रचना व आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यांची तपासणी करण्यासाठी महामेट्रोने निविदा काढल्या आहेत. या रचना आणि आराखड्याची तपासणी झाल्यानंतर प्रत्यक्षात या दुमजली उड्डाणपुलांच्या कामास सुरूवात होईल.

महामेट्रोने एकूण १७.७२ किलोमीटरचे दुमजली उड्डाणपूल प्रस्तावित केले आहेत. त्यात वनाझ ते चांदणी चौक या मेट्रो मार्गावर १.१२ किलोमीटरचा दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. यात पहिल्या पातळीवर वाहनांसाठी रस्ता आणि दुसऱ्या पातळीवर मेट्रो मार्ग असेल. तसेच, चांदणी चौक स्थानकापासून राष्ट्रीय महामार्गाला जोडणारा पादचारी पूल असेल. रामवाडी ते वाघोली या मार्गावर ११.६ किलोमीटरचा दुमजली उड्डाणपूल असेल. त्यात पहिल्या पातळीवर सहापदरी रस्ता असेल आणि दुसऱ्या पातळीवर मेट्रो मार्ग असेल. यातील ४.८ किलोमीटरचे दुमजली उड्डाणपुलाचे काम महामेट्रो करणार असून, उर्वरित ६.८ किलोमीटर दुजमली उड्डाणपुलाचे काम महाराष्ट्र पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) करणार आहे. मात्र, एमएसआयडीसी त्यातील पहिल्या पातळीवरील सहापदरी रस्त्याचे काम करेल आणि महामेट्रोकडून मेट्रो खांब व मार्गिकेचे काम केले जाईल, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

भैरोबानाला ते आकाशवाणी या मेट्रो मार्गावर ५ किलोमीटरचा दुमजली उड्डाणपूल असेल. सोलापूर रस्त्यावर रेस कोर्स ते आकाशवाणीदरम्यान तो उभारण्यात येईल. तो पहिल्या पातळीवर सहापदरी रस्ता आणि दुसऱ्या पातळीवर मेट्रो मार्ग असेल. याचबरोबर खराडी-खडकवासला आणि नळ स्टॉप ते माणिकबाग या मेट्रो मार्गांवर भविष्यात व्यवहार्य असेल तिथे दुमजली उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत, असे महामेट्रोतील सूत्रांनी स्पष्ट केले.

### मेट्रो मार्गांवरील दुमजली उड्डाणपूल

- वनाझ ते चांदणी चौक – १.१२ किलोमीटर
- रामवाडी ते वाघोली – ११.६ किलोमीटर
- भैरोबा नाला ते आकाशवाणी – ५ किलोमीटर

> शहरातील वाहतुकीचे भविष्यातील नियोजन लक्षात घेऊन मेट्रो मार्गासह दुमजली उड्डाणपुलांची उभारणी करणे आवश्यक आहे. यामुळे महापालिकेकडून महामेट्रोशी समन्वय साधला जात आहे. दुमजली उड्डाणपूल उभारण्यामागे वाहतुकीला वेग मिळावा, हा मुख्य हेतू आहे. मात्र, मेट्रोचा एखादा खांब रस्त्यात आल्यास त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. त्यामुळे महामेट्रोसोबत बैठक घेऊन या पुलांच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली.
>
> \- दिनकर गोजारे, मुख्य अभियंता (प्रकल्प), महापालिका

> महामेट्रोचे मेट्रो मार्गांवर दुमजली उड्डाणपूल उभारण्याचे नियोजन आहे. या दुमजली उड्डाणपुलांचे रचना व आराखडे सादर करण्यात आले होते. त्यांची तपासणी करण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. ही तपासणी पूर्ण झाल्यानंतर या दुमजली उड्डाणपुलांच्या उभारणीच्या दृष्टीने पुढील पावले उचलली जातील.
>
> \- चंद्रशेखर तांबवेकर, जनसंपर्क अधिकारी, महामेट्रो

# पुणे जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद; 58 टँकरद्वारे पाणीपुरवठा

## सव्वा लाख नागरिक टँकरच्या पाण्यावर अवलंबून; आंबेगाव तालुक्यात सर्वाधिक संकट



**पुणे | प्रतिनिधी**

मे महिन्याच्या अखेरीस वाढलेल्या उष्णतेमुळे पुणे जिल्ह्यातील पाणीटंचाईचे संकट अधिक तीव झाले असून, तब्बल सव्वा लाखांहून अधिक नागरिकांना आता टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. जिल्हा प्रशासनाच्या ताज्या आकडेवारीनुसार सध्या जिल्ह्यात 58 टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असून, ग्रामीण भागातील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे.

विशेषतः आंबेगाव तालुक्यात सर्वाधिक 28 टँकर सुरू असून, अनेक गावांतील विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीपुरवठा योजना पूर्णपणे कोरड्या पडल्या आहेत. त्यानंतर जुन्नर आणि खेड तालुक्यातही पाण्यासाठी नागरिकांची धावपळ वाढली आहे.

दरम्यान, पावसाळा अवघ्या काही आठवड्यांवर येऊन ठेपला असला तरी अनेक धरणे आणि स्थानिक जलस्रोत पूर्ण क्षमतेने भरलेले नसल्याने पुढील काळात परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

जलसंधारण, पावसाचे पाणी साठवण आणि दीर्घकालीन नियोजनाच्या अभावामुळे दरवर्षी उद्भवणाऱ्या या संकटावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

दरवर्षी उन्हाळ्यात पुणे जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट तीव्र होत असल्याने कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी जोर धरू लागली आहे. जलसंधारण, पावसाचे पाणी साठवण आणि स्थानिक जलस्रोतांचे पुनर्भरण यावर अधिक भर देण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे. अनेक धरणे आणि जलस्रोत पूर्ण क्षमतेने भरलेले नसल्याने आगामी काळात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. तज्ज्ञांच्या मते, दीर्घकालीन नियोजन आणि गावपातळीवर प्रभावी जलव्यवस्थापन केल्यास टँकरवरील अवलंबित्व कमी होऊन ग्रामीण भागातील पाणीटंचाईवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येऊ शकते.

### आंबेगाव तालुक्यात सर्वाधिक पाणीटंचाई

- पुणे जिल्ह्यातील वाढत्या उष्णतेमुळे ग्रामीण भागात पाणीटंचाईचे संकट गंभीर बनले आहे. विशेषतः आंबेगाव तालुक्यात सर्वाधिक २८ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असून अनेक गावांतील विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीपुरवठा योजना कोरड्या पडल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना पाण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत आहे. जिल्हा प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू असला तरी मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात निर्माण झालेल्या या परिस्थितीमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.